नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 08/05/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## मोटरसायकल चोरी करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत 02 कि.मी अंतरावर वार्ड क्र. 2 खापरखेडा येथे दि. 06/05/2021 चे 11.00 वा. ते 13.00 वा. चे फिर्यादी नामे— वामन विजय जाधव वय 30 रा वार्ड न 02 खापरखेडा यांच्या घरा समोरून एमएच— 31/एटी— 9149 क्रमांकाची हिरो होंडा मोटरसायकल कि. 15,000/— रू. ची चोरीस गेली होती. याबाबत पो.स्टे. खापरखेडा येथे अप क्र. 186/2021 कलम 379 भादवी प्रमाणे गुन्हा नोंद आहे. स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेत असता आरोपी हा चोरीस गेलेल्या मोटरसायकलने भानेगाव पारशिवनी टी पॉईंट परिसरात फिरत असल्याची माहिती मिळाली. पथकाने पारशिवनी टी पॉईंट परिसरात सापळा रचुन आरोपी नामे— संजय विनायक भिमटे, वय 27 वर्ष, रा. बिना याला ताब्यात घेतले. पूढील कार्यवाही करीता आरोपी यास पो.स्टे. खापरखेडा चे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, पो.हवा विनोद काळे, नापोशि शैलेश यादव, सत्यशील कोठारे, पोशि विरेन्द्र नरड, चासफौ साहेबराव बहाळे यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर